Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

:: परिपत्रक ::

संदर्भ क्र. : १. परिपत्रक जा.क्र. शिवाजीवि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३८६ दि. ०४.१०.२०२२
२. परिपत्रक जा.क्र. बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/५१ दि. ११.१०.२०२२.
३. या विभागाकडील दि. ०१ नोव्हेंबर २०२२ रोजीचा परीक्षा अर्ज जमा करण्याबाबतचा ई-मेल.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील मार्च/एप्रिल २०२२ सत्रातील परीक्षा नियोजनाबाबत उपरोक्त संदर्भ क्र. १ अनुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. त्यान्वये दि. २०.१०.२०२२ अखेर विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरुन घेवून सदर परीक्षा अर्जाच्या याद्या दि. २१.१०.२०२२ अखेर या विभागाकडे जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, आजतागायत बऱ्याच संबंधित महाविद्यालयांकडून/अधिविभागांकडून परीक्षा अर्ज या विभागाकडे सादर केलेले नाहीत. उपरोक्त संदर्भ क्र. १ अनुसार परीक्षेचा दिनांक २३.११.२०२२ निश्चित करण्यात आल्याने परीक्षा अर्ज वेळेत या विभागाकडे सादर न झालेस संबंधित विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या अनुषंगाने अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ अन्वये आपणांस कळविण्यात आले आहे.

सबब, सर्व संबंधित अधिविभाग/महाविद्यालये यांना पुन:श्च कळविण्यात येते की, एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क थेअरी परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ चे परीक्षा अर्ज पूर्णपणे तपासून या विभागाकडे सत्वर सादर करावेत.

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/५५
दि. १०.११.२०२२

प्रति,
मा अधिविभागप्रमुख/प्राचार्य/संचालक/समन्वयक,
विद्यापीठ अधिविभाग/सर्व संलग्नित संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संशोधन संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

इंटरनेट सेल : सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Home Page आणि Exam Circular येथे प्रकाशित करावे.